सातारा मतदारसंघात महायुती, मविआचे उमेदवार का जाहीर होईनात?

उदयनराजेंचे दिलखुलास उत्तर; 'बच्चा समझ के छोड दिया'

इम्तियाज मुजावर

राजदंड / पाचगणी

काही दिवसांपूर्वी खासदार उदयनराजे भोसले यांनी सातारात शक्तीप्रदर्शन करीत मी निवडणुक लढविणारच. कमळ चिन्हावरच निवडणुक लढवणार असेही स्पष्ट केले होते.

सातारा लोकसभा मतदारसंघात अद्याप महायुती असो अथवा महाविकास आघाडी कोणीच उमेदवार जाहीर केलेला नाही. उदयनराजेंनी निवडणुक बिनविरोध करण्याचा डाव आखला आहे का? असे राजेंना माध्यमांनी विचारताच त्यांचे (सगळ्यांचे) माझ्यावर प्रेम आहे. त्यामुळे ते देखील विचार करताहेत. आपण म्हणतो ना बच्चा समझ के छोड दिया. आता हा बच्चा मोठा झाला आहे हे त्यांना समजलंय. मला माझं कार्य केले पाहिजे. त्यांना त्यांचे कार्य केले पाहिजे. काही असलं तरी मतदारसंघात मैत्रीपूर्ण लढत होईल असेही राजेंनी नमूद केले.

महाबळेश्वर तालुकाच्या दौऱ्यावर उदयनराजे भोसले आल्यानंतर भिलार येथे किंगबेरी या गुहेत विविध निसर्गाचा जंगल सफारी करत असतानाच उदयनराजे उमेदवारीवर म्हणाले पक्षांनी उमेदवारी देऊ अथवा नाही देऊ मात्र मी या गुहेत अनेक पक्षी बघितले असे सांगत उदयनराजे यांनी मिश्किल पणे आत्तापर्यंत अद्यापही महायुतीकडून उमेदवारी न जाहीर झाल्यानंतर आपल्या उपविधात्मक प्रतिक्रिया दिल्या.

शरद पवारांनी साताऱ्यात येऊन कॉलर उडवली आता मी त्यांच्या बाबतीत काय सांगू माझं बारसं ज्यांनी जेवले आहेत त्यांच्या बाबतीत माझ्या काय प्रतिक्रिया असणारे असे सांगत उदयन राजे यांनी शरद पवारांसह महाविकास आघाडी मधल्या श्रीनिवास पाटलांसह इतरही ज्येष्ठ नेत्यांबाबत मिश्किल पणे प्रतिक्रिया दिल्या

साताऱ्याचे उदयनराजे भोसले नेहमीच वेगवेगळ्या स्टाईलने चर्चेत असतात मात्र उदयनराजे भोसले यांची कॉलर उडवण्याची स्टाईल संपूर्ण महाराष्ट्रात फेमस आहे आवर्जून उदयनराजे भोसले प्रत्येक कार्यक्रमांमध्ये ज्यावेळी येतात तरुणांच्या आग्रहास्तवते कायमस्वरूपी स्कॉलर उडवतात आणि तरुणांची मन जिंकतात मात्र उदयनराजे भोसले यांनी आवर्जून आज कॉलर उडवण्या पाठीमागचा किस्सा सांगितला नेमका काय आहे उदयनराजे भोसले यांच्या कॉलर उडवण्या पाठीमागचा इतिहास व्हिडिओ त्यांनी सांगितले.

श्रीनिवास पाटील एकदा मला दिल्लीत भेटले होते आणि म्हणाले मी तुमच्या बारशामध्ये होतो तुमच्या वडिलांचा मी मित्र त्यामुळे महाविकास आघाडीचे माझ्यासमोर असणाऱ्या प्रतिस्पर्धी मग ती शशिकांत शिंदे असो बाळासाहेब पाटील असो दस्तूर खुद्द शरद पवार असो प्रत्येकाचे वेगवेगळे वैचारिक मतभेद आहेत मात्र सगळ्यांचे माझ्याशी सलोख्याचे संबंध आहेत असे सांगत उदयनराजे भोसले यांनी आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवार बाबत आगळ्यावेगळ्या प्रतिक्रिया दिल्या.

२०१९ च्या लोकसभा पोटनिवडणुकीमध्ये उदयनराजे भोसले यांनी राष्ट्रवादीचा राजीनामा देत भाजप पक्षाचे तिकीट घेऊन उमेदवारी केली होती यामध्ये शरद पवार साताऱ्यात होते आणि मुसळधार पावसाची सभा संपूर्ण महाराष्ट्रात गाजली त्या पावसाच्या सभेची आठवण देत उदयनराजे भोसले म्हणाले त्यावेळी पावसामुळे सगळं झालं मात्र माझ्यावर आता सध्या तरी देवाची कृपादृष्टी आहे याही वेळेस पाऊस पडावा असे सांगत उदयनराजे भोसले यांनी सध्या तरी माझाच करिष्मा सातारा जिल्ह्यात चालेल असे संकेत दिले.

अद्यापी महाविकास आघाडीचा उमेदवार उदयनराजे यांच्या विरोधात घोषित होत नाहीये यावर पत्रकारांनी उदयनराजेंना विचारले असता उदयनराजे म्हणाले की महाविकास आघाडीच्या नेत्यांचे माझ्यावर प्रेम आहे.

कदाचित त्यांची उमेदवारी विलंब यामुळे होत असेल कारण ते म्हणत असतील की बच्चा समझके छोड दिया पण असो उदयनराजे भोसले यांनी महाविकास आघाडीची उमेदवार अजूनही घोषित होत नाही यावर बच्चा समजा क्या? असे सांगत उमेदवारी अद्याप घोषित होत नाही यावर प्रतिक्रिया दिल्या.

वडगाव मावळ मतदान केंद्रांची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

राजदंड / वडगाव मावळ

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी मावळ लोकसभा मतदारसंघाअंतर्गत पिंपरी, चिंचवड आणि मावळ विधानसभा मतदार संघातील स्ट्रॉंग रुमला भेट दिली. स्ट्रॉंग रूमच्या सुरक्षेची योग्य खबरदारी घ्यावी, असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

डॉ. दिवसे यांनी गुरुवारी (दि. ४) पिंपरी विधानसभा मतदार संघ कार्यालयांतर्गत ऑटो क्लस्टर, चिंचवड येथील मतदान साहित्य वाटप व स्वीकृती केंद्र आणि निगडी प्राधिकरण येथील डॉ. हेडगेवार भवनातील स्ट्रॉंग रूम, थेरगाव येथील स्व. शंकर आण्णा गावडे कामगार भवन येथे तयार करण्यात आलेल्या स्ट्रॉंग रूम, साहित्य वाटप व स्वीकृती केंद्र, देहूरोड येथील मतदान केंद्र, सोमाटणे येथील जिल्हा परिषद शाळा मतदान केंद्र व नूतन महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग अँड टेक्नॉलॉजी तळेगाव दाभाडे येथील स्ट्रॉंग रूमची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी स्टॉंगरूम व्यवस्थापन सर्व नोडल अधिकारी नियोजनाबाबत आढावा घेतला.

मतदान यंत्रे ठेवण्यासाठीची व्यवस्था, सीसीटिव्ही यंत्रणा, अग्निशमन व्यवस्था यांची बारकाईने चाचणी करण्यात यावी, तसेच त्याठिकाणी २४÷७ आवश्यक पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था करावी. निवडणुकीसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सुविधा पुरविण्याकडे लक्ष द्यावे. कायदा व सुव्यवस्था व पोलीस बंदोबस्त आराखडा निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार करण्यात यावा. मतदान जनजागृती, अधिकारी, कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाबाबतही निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी २०४ मावळ मतदार संघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी माननीय सुरेंद्र नवले मावळ तहसिल विक्रम देशमुख, वडगाव नगरपंचायत मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ प्रविण निकम, वडगाव मावळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कुमार कदम नायब तहसीलदार तळेकर बजरंग मेकाले, तसेच सर्व अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी आयोजित क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाचीही पाहणी करुन क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी संवाद साधला.

यावेळी उपविभागीय अधिकारी नवले यांनी मावळ विधानसभा मतदार संघातील पूर्वतयारी व नियोजनाबाबत माहिती दिली. मावळ मतदार संघामध्ये एकूण ३९० मतदान केंद्र आहेत. एकूण ४५ सेक्टर ऑफिसर यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच प्रत्येकी ६ फिरती पथके (एफएसटी) व स्थीर निरीक्षण पथके (एसएसटी), ३ व्हीएसटी व २ व्हिडीओ पाहणी पथक (व्हीव्हीटी) व १ उमेदवार खर्च नोंदणी पथक अशी पथके कार्यान्वित करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ सुहास दिवसे यांनी वडगाव मावळ येथील रमेश कुमार सहानी शाळेमधील मतदान केंद्राची पाहणी केली व त्याबाबत समाधान व्यक्त केले.

निवडणुकीसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सुविधा पुरविण्याकडे लक्ष द्यावे. कायदा व सुव्यवस्था व पोलीस बंदोबस्त आराखडा निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार करण्यात यावा. मतदान जनजागृती, अधिकारी, कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाबाबतही निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

छत्रपती संभाजी महाराज पतसंस्थेची घोडदौड कायम

२०२३-२४ मध्ये चार कोटींचा नफा...

राजदंड / कोरेगाव

पिंपोडे बुद्रुक (ता. कोरेगाव) येथील छत्रपती संभाजी महाराज पतसंस्थेने सहकारी पतसंस्थेने नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात ११६५ कोटींचा संमिश्र व्यवसाय करत चार कोटी रुपयांचा नफा मिळवला आहे. अडचणीतील १५ सहकारी पतसंस्थांचे विलीनीकरण करणारी ही राज्यातील एकमेव संस्था असल्याची माहिती सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक रामभाऊ लेंभे यांनी दिली.

एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या आर्थिक वर्षातील व्यवसायाचा आढावा घेण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

राज्यभरात ५३ शाखांच्या माध्यमातून संस्थेचे कामकाज सुरू आहे. यंदा दुष्काळी परिस्थिती असताना ठेवीत ९० कोटींनी वाढ झाल्याचे सांगून संस्थापक श्री. लेंभे म्हणाले, संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षित सेवक वर्गाने सल्लागारांच्या साह्याने चिकाटीने काम

केल्यामुळे संस्थेच्या संमिश्र व्यवसायात १६८ कोटी ८७ लाखांनी वाढ झाली आहे. एकूण कर्जाच्या ३६ टक्के म्हणजे १८३ कोटींचे सोनेतारण कर्ज व्यवहार आहेत. खेळते भांडवल, स्वनिधीत भरीव वाढ झाली आहे. ९ कोटी ७२ लाखांनी गुंतवणुक वाढली आहे. पतसंस्थेची ३१ मार्च २०२४ अखेर सांपत्तिक स्थिती पुढीलप्रमाणे- भागभांडवल २७ कोटी ९२ लाख, सभासद संख्या ७२७०३, ठेवी ६६१ कोटी २९ लाख, कर्जवाटप ५०३ कोटी ७५ लाख, गुंतवणूक १८९ कोटी ४४ लाख, खेळते भांडवल ७४२ कोटी, स्वनिधी ६७ कोटी ५३ लाख रुपये आहे.

यंदा सर्वत्र दुष्काळ असताना संस्था मजबूत स्थितीत आहे. राज्यातील १५ पतसंस्थांचे विलीनीकरण करून ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याची भूमिका घेतली आहे. नवी सांगवी (पुणे), उलवे (मुंबई) आणि वेल्हे येथे लवकरच तीन नवीन शाखा सुरू करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

मतदान जागृती उपक्रमात ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी स्वीपमार्फत राबविण्यात येणाऱ्या मोहिमेमध्ये विद्यार्थी, युवा, महिलांच्या सहभागासोबतच वडगावशेरी विधानसभा मतदार संघातील ज्येष्ठ नागरिकही सहभागी झाले आहेत.

वडगावशेरी मतदार संघातील स्वीप पथकाने टँक रोड, विश्रांतवाडी येथे ज्येष्ठ नागरिक कट्ट्यावरील ज्येष्ठ नागरिकांना मतदान प्रक्रिया समजावून देत मतदानाची शपथ दिली. ज्येष्ठ नागरिकांना सुलभ मतदानासाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती यावेळी देण्यात आली. लोकशाहीच्या उत्सवात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन ज्येष्ठ नागरिकांनी यावेळी केले.

स्वीप पथकाकडून मस्केवस्ती, आळंदी रोड, विश्रांतवाडी पोस्ट ऑफीस, धर्मवीर संभाजी को. अर्बन बँक विश्रांतवाडी, येरवडा येथील जिल्हा होमगार्ड प्रशासकीय कार्यालय, आरोग्य भवन, येथे

मतदान जागृती करण्यात आली.

पर्वती विधानसभा मतदार संघांतर्गत स्वारगेट बस डेपो मेकॅनिकल स्टाफ यांना स्वीप पथकाकडून मतदान प्रक्रियेविषयी माहिती देऊन शपथ देण्यात आली. शिवाजीनगर विधानसभा मतदार संघात लोकशाही अधिक बळकट व्हावी यासाठी विविध स्पर्धा, विद्यार्थी रॅलीद्वारे जनजागृती करण्यात येत असून त्याअंतर्गत सौ. विमलाबाई गरवारे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वीर नेताजी पालकर येथील विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धा व रॅलीद्वारे घोषणा देत नागरिकांना मतदानाचे आवाहन केले. स्वीप पथकाने विविध ठिकाणी क्युआर कोडचा वापर करून मतदार यादीतील नाव व मतदान केंद्र शोधण्याविषयी माहिती दिली.

■ **वडगावशेरी येथे आढावा बैठक**

वडगावशेरी विधानसभा मतदार संघातील सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन बारवकर यांनी सर्व समन्वयक अधिकाऱ्यांच्या निवडणूक विषयक कामकाजाचा आढावा घेतला. श्री. बारवकर यांनी कामात येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या. अधिकाऱ्यांनी सतर्क राहून आपापली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडण्याच्या सूचना यावेळी दिल्या. बैठकीला अतिरिक्त सहायक निवडणूक अधिकारी तृप्ती कोलते, गौरी शंकरदास उपस्थित होत्या.

'निसर्ग कार्यशाळा' होणे ही काळाची गरज : शिवांगी जोशी

■ **कोयनानगर येथे दोनदिवसीय निसर्ग कार्यशाळा संपन्न**

राजदंड / पाटण

निसर्ग परिसंस्थेकडे अभ्यास दृष्टिकोनातून पाहण्यासाठी अशा निसर्ग कार्यशाळा होणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन वनस्पतिशास्त्रज्ञ सौ. शिवांगी जोशी यांनी केले.

जीविधा आउटडोअर, पुणे, कोयना डिस्कवर व पाटण तालुका निसर्ग पर्यटन संवर्धन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने कोयनानगर (नवजा) येथे दोन दिवसीय निसर्ग कार्यशाळा पार पडली. याप्रसंगी वनस्पतिशास्त्रज्ञ सौ. शिवांगी जोशी बोलत होत्या.

पाटण तालुका हा जैवविविधतेने संपन्न असल्याने येथील सडेपठार व दुर्मिळ वनस्पती, पक्षी, प्राणी आणि निसर्ग हा कमालीचा विलक्षण आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊन त्याची शास्त्रीयदृष्ट्या अभ्यासपूर्ण गुण वैशिष्ट्ये तपासून निसर्ग संवर्धन व पर्यटन वाढीसाठी या भूगर्भशाखेची, वनस्पतिशास्त्राची आणि वनदुर्ग किल्ल्यांच्या रचनांचा अभ्यास म्हणून जीविधा पुणे, कोयना डिस्कवर आणि पाटण तालुका निसर्ग पर्यावरण संवर्धन पर्यटन समिती, पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने कोयनानगर येथे २ दिवसाची कार्यशाळा घेण्यात आली.

याप्रसंगी गडकिल्ले कसे पहायचे, प्रत्यक्षात निसर्गात जाऊन वेगवेगळ्या वनस्पती कशा ओळखाव्यात तसेच सह्याद्रीची उत्पत्ती, सह्याद्रीमधील वैशिष्ट्ये याबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी जीविधा संस्था, पुणे येथील राजीव पंडित (संस्थापक जीविधा), सौ. शिवांगी जोशी (वनस्पतिशास्त्रज्ञ), हार्दिक संकलेजा (भूविज्ञान शास्त्र) यांनी सखोल मार्गदर्शन केले. त्यावेळी कोयना डिस्कवरचे महेश शेलार, संग्राम कांबळे, सागर जाधव, पांडुरंग कदम व पाटण तालुका निसर्ग पर्यावरण, संवर्धन, पर्यटन समितीचे अनिल बोधे, नीलेश फुटाणे, सुशांत शिंदे व सर्व निसर्ग मार्गदर्शक सदस्य उपस्थित होते.

पान १ वरून

साताऱ्यात पृथ्वीराज चव्हाणांना आमच्याच 'चिन्हा'वर लढावे लागेल - शरद पवार

याकडे सुद्धा लक्ष असेल. बाळासाहेब पाटील यांनी निवडणूक लढवण्यास नकार दिला होता. सत्यजित पाटणकर आणि सुनील माने यांच्या नावाची सुद्धा चर्चा होती. शिंदे गटाचे पुरुषोत्तम जाधव यांनी सुद्धा शरद पवार यांची तीनवेळा भेट घेत आपण कसे सातारा लोकसभेसाठी योग्य आहोत हे समजावण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे पृथ्वीराज चव्हाण यांचा पर्याय मागे पडल्यास शशिकांत शिंदे यांच्या नावावर शरद पवार यांच्याकडून शिक्कामोर्तब केलं जाण्याची शक्यता आहे.

कदाचित त्यांचा मला 'बिनविरोध' करण्याचा विचार असेल - उदयनराजे

उमेदवार कोण ही सगळे मिळून तुम्हाला बिनविरोध करणार आहेत असे विचारले असता 'बच्चा समझ के छोड दिया' असे दिलखुलास उत्तर उदयनराजेंनी दिले.

पळवून नेणे व पोक्सो गुन्ह्यातील फरारी आरोपी जेरबंद

संशयित बज्या माने हा कराड परीसरात येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने पोलीस उपनिरीक्षक पतंग पाटील व त्यांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो. कॉ. आनंदा जाधव, महेश शिंदे यांनी कराड शहरालगत वारुंजीफाटा- पाटण रोड येथे सापळा रचुन थांबले असताना संशयिताला पोलीसांची चाहुल लागल्याने तो पळुन जाण्याच्या तयारीत असतानाच गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक पतंग पाटील, पोलीस अंमलदार पो. कॉ. आनंदा जाधव व पो. कॉ. महेश शिंदे यांनी त्यांस पाठलाग करुन शिताफीने पकडले. बज्या उर्फ बजरंग सुरेश माने, वय- ३० वर्षे. रा. बुधवार पेठ, कराड ता. कराड हा संशयित गुन्हा केल्यापासुन फरार झाला होता.

साताऱ्यात महायुतीचा ८ एप्रिलला भव्य मेळावा

भव्य मेळावे घेण्याचे नियोजन ठरले होते त्यानुसार महायुतीचा पहिला भव्य मेळावा शेंद्रे येथील अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर होणार आहे . या मेळाव्याला भाजप ,शिंदे गट, तसेच राष्ट्रवादी अजित दादा पवार गट या तिन्ही घटक पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहणार आहेत

वसंत मोरे यांचा बहुजन आघाडीत प्रवेश

बोलणी सुरू होती. या चर्चेतून काही मार्ग निघण्याआधीच वसंत मोरे यांनी वंचितमध्ये अधिकृतरीते प्रवेश केला आहे. यावेळी आपणच ही निवडणूक जिंकू असा दावा वसंत मोरे यांनी केला आहे. पुण्यामध्ये वसंत मोरेंना वंचितनं उमेदवारी दिलीय. त्यामुळं काँग्रेसच्या रवींद्र धंगेकरांचं भवितव्य धोक्यात आलंय.

भाजपच्या विरोधात तिसरी आघाडी उभी करण्याचा दावा वंचित बहुजन आघाडीनं केला आहे. महाविकास आघाडीतून बाहेर पडत वंचित बहुजन आघाडीनं लोकसभा निवडणुकीसाठी आतापर्यंत तब्बल २५ उमेदवार मैदानात उतरवलेत. अकोल्यामधून वंचितचे नेते प्रकाश आंबेडकर स्वत: लोकसभा निवडणूक लढवत आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून परीक्षेच्या वेळापत्रकात बदल

आलेल्या आहेत,जाहिरात प्रसिद्ध होऊन अर्ज मागविण्यात आलेले असून निवड प्रक्रिया सुरु झालेली नाही, अशा प्रकरणी शासनाकडून सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरिता आरक्षण विचारात घेऊन नव्याने आरक्षण निश्चिती करून घेणे गरजेचे आहे व त्याप्रमाणे मागणीपत्र पाठविण्याबाबत शासनाच्या सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना कळविण्यात आले आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ करिता दिनांक २९ डिसेंबर, २०२३ रोजी विविध संवर्गातील एकूण २७४ पदांकरीता जाहिरात क्रमांक ४१४/२०२३ प्रसिद्ध करण्यात आली होती.

लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाचे 'बूथ विजय' अभियान

प्रत्येक बुथवर ३७० मते वाढविण्याचा निर्धार; शहराध्यक्ष धीरज घाटे यांची माहिती

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी भाजपकडून माजी महापौर आणि प्रदेश भाजपचे सरचिटणीस मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी देण्यात आली आहे. भाजपकडून शहरात जोरदार प्रचार यंत्रणा राबवली जात असून मोहोळ यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी भाजपच्या वर्धापन दिनानिमित्त ६ आणि ७ एप्रिल रोजी 'घर चलो अभियान' राबवण्यात येणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून शहरातील जवळपास दहा ते बारा लाख मतदारांपर्यंत पोहोचण्याचा मेगा प्लॅन भाजपकडून आखण्यात आला आहे. या अभियानात भाजपाचे १० हजार पेक्षा जास्त कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.

६ एप्रिलला भाजपचा ४४ वा वर्धापन दिन असून या दिवशी पुणे शहर भाजपकडून मोहोळ यांच्या प्रचारासाठी ३ लाख घरांमध्ये विशेष संपर्क मोहीम राबविण्यात येणार आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि मंत्री चंद्रकांतदादा पाटील, खासदार प्रा. मेधा कुलकर्णी, सर्व आमदार यांच्यासह १० हजार पेक्षा जास्त कार्यकर्ते या अभियानात सहभागी होणार असल्याचे घाटे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, पुणे लोकसभा निवडणूक प्रभारी श्रीनाथ भिमाले,सरचिटणीस पुनीत जोशी, रवी साळेगावकर, राजू शिळमकर,राघवेंद्र बापू मानकर,संदीप खर्डेकर, अमोल कविटकर, हरीश परदेशी, पुष्कर तुळजापूरकर यांच्या सह भाजपचे सर्व प्रमुख पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीत ''अब की बार ४०० पार'' ही घोषणा प्रत्यक्षात आणण्यासाठी भारतीय जनता पार्टीने प्रत्येक बुथवर ३७० मते वाढविण्याचा निर्धार केला आहे, असेही घाटे यांनी सांगितले.

घाटे म्हणाले, विधानसभा स्तरावर पक्षाच्या बूथस्तरीय कार्यकर्त्यांचे तसेच पन्ना प्रमुखांचे मेळावे या अभियानात आयोजित केले जाणार आहेत. मागील तीन निवडणुकीतील मतदानाच्या आकडेवारीचा आढावा घेऊन यावेळच्या निवडणुकीसाठी मतदानाचे उद्दिष्ट निश्चित केले जाणार आहे. या अभियानात प्रत्येक बूथवर मागच्या निवडणुकीपेक्षा ३७० मते वाढवण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत. या अभियानात समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचण्याचे लक्ष्य आहे.

मतदारांशी थेट संपर्क साधणे, प्रत्येक घर, वाहनावर स्टिकर्स लावणे, लाभार्थींशी नियमित संपर्कात राहणे, प्रत्येक कार्यकर्त्याच्या घरी भाजपा चा झेंडा लावणे आदी उपक्रम राबवले जातील. युवा वर्ग, महिला अशा समाजातील विविध घटकांसाठी ५ समूह बैठकाही घेण्यात येतील, अशी माहितीही घाटे यांनी दिली. मोदी सरकारचे कार्य व योजना पोहोचवून भाजपा ला मत देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. बूथपासून दूर रहाणा-या मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात येईल असे घाटे यांनी सांगितले.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वात पुणे शहर भाजपच्या विविध आघाड्या आणि मोर्चे यांच्या बैठका झाल्या. महिला मोर्चा, ओबीसी मोर्चा, व्यापारी आघाडी, मंडल अध्यक्ष, विस्तारक सोशल मीडिया आणि आयटी सेल, अनुसूचित जाती मोर्चा, झोपडपट्टी आघाडी, वैद्यकीय आघाडी, पर्यावरण आघाडी, उत्तर व दक्षिण भारतीय आघाडी, अल्पसंख्याक आघाडी, सहकार, पायाभूत सुविधा, शिक्षक भटके विमुक्त आघाडी यांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन निवडणूक तयारीचा आढावा घेतला. तसेच, पदाधिकाऱ्यांच्या सूचना देखील जाणून घेतल्याचे घाटे यांनी सांगितले.

गेल्या दहा वर्षात पुणे शहरात भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत. विकसित पुण्यासाठी मतदारांनी याही वेळी भाजपा बरोबर राहण्याचा निर्धार केलेला आहे. नरेंद्र मोदी यांना सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून पुणेकरांना पाहायचे आहे. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) राष्ट्रीय समाज पक्ष असे महायुतीतील विविध घटक पक्ष प्रचाराच्या नियोजनात सहभागी झाले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार राज्यातील सरकारच्या माध्यमातून चांगले काम करत आहे चांगलं काम करत आहेत. त्यामुळे मुरलीधर मोहोळ मोठ्या मताधिक्याने विजयी होतील असा दृढ विश्वास घाटे यांनी व्यक्त केला.